**नि.दि.दावा क्र. ६८०/२०१९ मध्ये निशानी क्र.१९ वर आदेश**

प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे दाखल करण्यात आलेला लेखी कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफीचा अर्ज वाचला. त्यावर वादीतर्फे दाखल म्हणण्याचे अवलोकन केले. उभय पक्षाच्या विद्‌वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

२. उपरोक्त प्रतिवादी /अर्जदारांचे असे कथन आहे की, प्रकरण खरेदीखत रद्द बातल ठरवून कब्जा मिळविण्यासाठी दाखल करण्यात आलेले आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना दि. १४.०१.२०२० रोजी समन्सची बजावणी झाली व ते दि. २४.०१.२०२० रोजी हजर झाले. कोरोना रोगाच्या महामारीमुळे त्यांना दाव्याविषयी आवश्यक माहिती वकिलांना देता आली नाही. त्यामुळे त्यांना विहित मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. त्यांचे पुढे असे कथन आहे की, कोरोना रोगाच्या महामारीमुळे त्यांना दि. १४.०१. २०२० ते दि. २०.०२.२०२१ असा एकूण १ वर्ष १ महिना ६ दिवस कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा त्यांनी जाणीवपुर्वक केलेला नाही. विलंब माफ न झाल्यास त्यांचे अतोनात नुकसान होईल. त्यामुळे त्यांनी उपरोक्त विलंब माफ करण्याची विनंती केलेली आहे.

३. वादीने सदर अर्जास आक्षेप नोंदविताना असे कथन केले आहे की, प्रतिवादींनी अर्जामध्ये विलंबाबाबत योग्य ते स्पष्टकरण दिलेले नसुन त्यांनी दिलेले कारण संयुक्तीक नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती वादीने केली आहे.

४. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे दिसून येते की, उपरोक्त प्रतिवादींना दि. १४.०१.२०२० रोजी दाव्याचे समन्स बजावण्यात आले होते. तद्‌नंतर ९० दिवसांच्या आत प्रतिवादींनी त्यांची कैफियत देणे अपेक्षीत होते. परंतु प्रतिवादी

कैफियत देण्यास असमर्थ ठरले. प्रतिवादींतर्फे हा अर्ज दि. २०.०२.२०२१ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. दावा खरेदीखत रद्दबातल करुन पृथ्थक कब्जा मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादींवर समन्सची बजावणी झाल्यापासून विहित वेळेनंतर कोराना विषाणूच्या महामारीमुळे सर्व व्यवहार ठप्प होते. तसेच सर्व शासकीय कार्यालये देखील ब-याच कालावधीकरीता बंद होती. त्यामुळे प्रतिवादींनी अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तीक वाटते. तसेच दाव्याचे गुणदोषावर निराकरण होण्यासाठी उपरोक्त प्रतिवादी / अर्जदारांना त्यांची कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करणे योग्य व न्यायोचित आहे. सबब, अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज रक्कम रुपये ५००/- इतक्या खर्चावर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. प्रतिवादींनी वादीला सदर अर्जाचा खर्च पुढील तारखेपर्यंत अदा करावा अन्यथा सदरचा अर्ज आपोआप खारीज समजण्यात येईल.

स्वा/-

दिनांक ११.११.२०२१

( बी. एस. संकपाळ )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

| | |
|---|---|
| Dictated on | : 11/11/2021 |
| Transcribed on | : 11/11/2021 |
| Checked & signed on | : 11/11/2021 |

Sd/-

(P.V. Bhosale),
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.